**स. क्रि. केस नं.१५४/२०१९**

**निशाणी – ६०**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्रमांक – ०३ मी शपथपूर्वक सांगतो कि –**

**माझे नाव –** सुधीर रामचंद्र खाडे

**वय** – ५१, **व्यवसाय**– विकास अधिकारी, सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा पुसेसावळी

**राहणार**– वडूज, ता. खटाव, जि. सातारा.

**फिर्यादीतर्फे वकिल श्री.यु.एस.यादव यांचे तर्फे साक्षीदारचा सरतपास शपथेवर –**

१. मला कोर्टाचे साक्षीसमन्स आहे. मला समन्स सचिवांनी पाठविले. ते मला माझ्या व्हॉट्सअॅपवर पाठविले आहे. वडी गावचे किरण, दादासो, बाळकृष्ण व कमल भिंताडे हे माझ्या ओळखीचे आहेत. त्यांनी शेतघर बांधण्याकरीता सोसायटीकडे कर्जप्रकरण केले असून ते आमच्या बँकेने मंजूर केले आहे. आम्ही त्यांना एकुण कर्ज र.रु.५,००,०००/– अदा केले आहे.

२. (साक्षीदारास निशाणी ५५ सोबत कागदयादीतील मंजूर मध्यम मुदत कर्ज मागणी अर्ज फॉर्म नं.२ दाखविला.) त्या फॉर्ममध्ये किरण, दादासो, बाळकृष्ण व कमल यांना रक्कम अदा केल्याच्या नोंदी आहेत. त्या रकमा चार हप्त्यात अदा केल्या आहेत. फॉर्ममधील मजकूर सचिव यांच्या हस्ताक्षरातील आहे. ते सचिव म्हणजे विकास सेवा सोसायटीचे सचिव आहेत. त्या फॉर्मवर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. फॉर्मला **निशाणी ६१** देण्यात येते. साक्षीदारास निशाणी ५५ सोबत असलेल्या कागदयादीतील योजनापुर्णत्वाचा दाखला दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्या दाखल्याची सत्यप्रत दाखल केली

असल्याने त्याला **निशाणी ६२** देण्यात येते. किरण, दादासो, बाळकृष्ण व कमल यांच्या घराचे बांधकाम पुर्ण झाल्याचा दाखला देणेपुर्वी आम्ही प्रत्यक्ष जागेवर जावून पाहणी केली. घराचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर शेवटचा हप्ता अदा केला जातो. आम्ही किरण, दादासो, बाळकृष्ण व कमल यांना शेवटचा हप्ता दिनांक ०४/४/२०१९ रोजी अदा केला. प्रत्येक हप्ता देत असताना मी रक्कम अदा करणेबाबत शिफारस करतो. त्यानुसार किरण, दादासो, बाळकृष्ण व कमल यांना चारही हप्ते दिल्याबाबत शिफारस केली आहे. निशाणी ५५ सोबत असलेल्या कागदयादीतील दिनांक ०४/०४/२०१९, ३०/०७/२०१८ व दिनांक १२/०७/२०१८ रोजीची शिफारस केलेली कागदपत्रे साक्षीदारास दाखवली. त्यावर माझी तसेच किरण, दादासो, बाळकृष्ण व कमल यांच्या सह्या आहेत. ती कागदपत्रे सत्यप्रत असल्याने त्यांना **निशाणी ६३ ते ६५** देण्यात येते.

३. किरण, दादासो, बाळकृष्ण व कमल यांच्या घराचे पुर्ण बांधकाम झाल्यानंतर शेवटचा हप्ता अदा केला आहे. किरण, दादासो, बाळकृष्ण व कमल या चौघांची एकच घर बांधले आहे. त्याचा मिळकत नं.३८३/१ आहे.

**आरोपींतर्फे वकील श्री.एम.एम.शिंदे यांचे मार्फत साक्षीदाराचा उलटतपास सुरु–**

४. मी विकास अधिकारी म्हणून कर्ज वाटप, कर्ज वसुली तसेच मुख्य कार्यालयाने ठरवून दिलेली माहिती त्यांना पुरविणे ही कामे करतो. निशाणी ६१ वर माझी सही नसून पुर्वीचे विकास अधिकारी यांची सही आहे. हे खरे की, निशाणी ६१ वरील कागदपत्र मी स्वतः तयार केले नाही. हे खरे नाही की, त्यामुळे त्यातील मजकूर खरा आहे अगर कसे मला सांगता येणार नाही. हे खरे की, निशाणी ६१ मध्ये नमुद

असलेला व्यवहार माझ्या समक्ष झालेला नाही. हे खरे की, मी जागेवर जावून स्थळ पाहणी केल्याबाबत  किरण, दादासो, बाळकृष्ण व कमल यांचे जबाब घेतलेले नाहीत. हे खरे नाही की, घराचा प्लॅन घेवून त्या प्रमाणे घर झाले की नाही याची प्रत्यक्ष जागेवर जावून खात्री केली नाही. त्यावेळी माझ्यासोबत कोणीही इंजिनिअर नव्हते. त्या घराचे फरशीचे, नळाचे काम झाले अगर कसे याची खात्री मी केली होती. त्याचे मी फोटो काढले नव्हते. तसे फोटो काढायला तुम्हाला काही अडचण नव्हती या प्रश्नाला साक्षीदाराने आमच्या बँकेची तशी प्रासीजर नाही असे उत्तर दिले.

५. मी स्थळपाहणीच्यावेळी जो प्लॅन घेवून गेलो होतो तो आज सोबत आणला आहे. हे खरे की, सिव्हील अगर आर्किटेक्चरर शिक्षण झालेले नाही. हे खरे की, निशाणी ६३ ते ६५ मध्ये कोणाच्या खात्यावर किती रक्कम अदा केली ते नमुद नाही. हे खरे की, निशाणी ६३ ते ६५ वर माझ्या सह्या नाहीत. हे खरे नाही की, मी प्रत्यक्ष जागेवर जावून पाहणी करुन पुर्णत्वाचा दाखला दिला हे खोटे सांगतो. हे खरे की, निशाणी ६१  ते ६५ वरील कागदपत्रे माझ्या समक्ष तयार झालेली नाहीत.

उलटतपास पुर्ण, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दि. ११/०८/२०२३ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कडेगांव.